Vol 1 Issue 7 May 2012

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Catalina Neculai
University of Coventry, UK

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.net**

Research Papers

# बौद्ध धर्म आणि धम्म

*अनिल माणिकराव बैसाणे*
इतिहास विभाग प्रमुख, झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे .

***प्रास्ताविक***

गौतमबुद्धाने बौद्ध धर्माची स्थापना केली. बौद्ध धर्म अहिंसा, प्रेम, दया व शांती, यावर आधारलेला आहे. या तत्वाचा प्रचारासाठीच बुद्धांनी आपले उरलेले आयुष्य खर्ची घातले. बौद्ध धर्माच्या तत्वज्ञानात सदाचारावर आणि नैतिक आचरणावर अधिक भर दिला आहे. दैनंदिन जीवनात अहिंसेचे आचरण करावे, मातापित्यांची सेवासुश्रुषा करावी, गुंरूजन व वडिलधारी व्यक्ती यांचा सन्मान करावे, श्रमण, गोरगरीबांना दान करावे, दुष्टबुद्धी आणि परपीडा बुद्धी यांचा त्याग करावा क्रोध, कठोरता, गर्व, ईर्ष्या इत्यादी दुगूर्णापासून दूर रहावे. अशी सदाचारणांची तत्वे आहेत. बुद्धासमोर प्रश्न होता त्यामुळे बुद्धांनी आपल्या साऱ्या चर्चेचा केंद्रबिंदू मानवाचे प्रत्यक्ष जीवन आणि त्या जीवनातील दु:ख मानले आणि त्यादृश्टिने आपले तत्वज्ञान उदयाला आले. या तत्वज्ञानातून बुद्धांचे विचार सुत्रबद्ध स्पष्ट झाले. बाबासाहेबांनी ही चर्चा बुद्ध आणि त्याचा धम्म या ग्रंथाचा तिसऱ्या खंडात केली आहे.

विश्वाच्या मुळाशी अंतिम सत्य कोणते आहे., हा तत्वज्ञानाच्या क्षेत्रातील एक विवाद्य जटील प्रश्न आहे? बौद्ध तत्वज्ञानााने एका कारणापासून एक अथवा अनेक परिणाम उद्‌भवतात असे गृहीत धरणारी जुनी कल्पना खोडून काढली. बौद्ध तत्वज्ञानानुसार कोणत्याही वस्तुंचा जन्म किंवा त्यांच्याच शब्दात धर्म एकाच वस्तुतून होत नाही कारण परिणामाहून पूर्णपणे वेगळे असते. बाबासाहेबांनी भगवान बुद्धांना गुरू मानल्यामुळे त्यांची या क्षेत्रातील विचारपद्धती अधिक स्पष्ट झाली.

गौतम बुद्धाने जीवनाचा नवीन मार्ग दाखवून दिला शाश्वत सत्याची ओळख करून घेण्याकरिता बुद्धाने चार प्रमुख तत्वे सोगितली त्यांना बुद्धाची चार आर्यसत्ये मानतात ही आर्यसत्ये पुढीलप्रमाणे –

1.जीवन दुःखमय आहे.
2.तृष्णा हे दुःखाचे कारण होय मनुष्याला प्रत्येक गोष्टी बद्दल वाटणारी आशा किंवा आसक्ती याला तृष्णा असे म्हणतात.
3.आसक्तीचा त्याग केल्याशिवाय दुःखमुक्त होता येणार नाही.
4.आसक्तीचा त्याग करण्याकरिता पुढील आठ गोष्टी केल्या पाहिजेत, त्यासाठी आष्टांगमार्ग याचा अवलंब केला पाहिजे हे अष्टांग मार्ग पुढीलप्रमाणे.

1.सम्यक श्रद्धा : बुद्धाने सांगितलया चार आर्थ्य सत्याची जाणीव सतत ठेवणे.
2.सम्यक विचार : कोणालाही दुःख होईल किंवा वाईट वाटेल असे विचार न ठेवले.
3.सम्यक वाणी : कोणालाही वाईट वाटेल असे भाषण करू नये थोडक्यात असत्य भाषण किंवा दुसऱ्यास दुःख वाटेल असे भाषण करू नये.
4.सम्यककृती : नेहमी सत्कर्मे करीत जावे.
5.सम्यक व्यवसाय : चांगल्या रीतीने आपला व्यवसाय करावा.
6.सम्यक सदाचार : कोणालाही दुःख होईल असा विचार नसावा.
7.सम्यक सावधान : संसार हा दुःखपूर्ण आहे याची जाणीव ठेवून चार आर्यसत्यावर आपले लक्ष केंद्रीत करून व्यक्तीचे आचरण करावे.
8.सम्यक चिंतन : नितीच्या व परहिताच्या चिंतनात कालक्रमणा करावी.

***बौद्ध तत्वज्ञानाची वैशिष्टे***

1.मध्यम मार्गाचे अवलंबन : बौद्ध धर्माचा कर्म तत्वज्ञानावर विश्वास होता आणि कर्म गती कोणीच रोखू शकत नाही असे यात सांगितले आहे. थोडक्यात मानवी दुःख किंवा यातना नाहीशी करण्याचा बुद्धाने जो मार्ग सांगितला तोच मध्यममार्ग समजला जातो आणि या मध्यम मार्गाचा स्वीकार केल्यास मोक्ष मिळतो असे बुद्धाने सांगितले.
2.सतकर्म मनुष्याला त्याच्या कर्माची फळे भोगावी लागतात म्हणून प्रत्येकाने सतकर्म करावे आणि सतकर्माच्याद्वारेच निर्माण पद प्राप्त होते.
3.सदाचार : बुद्धाने सदाचरणवर भर दिला आहे. सत्य, अहिंसा, असत्य, अपरिग्रह याचा प्रत्येकाने दैनंदिन जीवनात वापर करावा.
4.सहिष्णुता गौतमबुद्धाने सहिष्णूतेला अतिशय महत्व दिले आहे. अंधश्रद्धेने कोणतीही गोष्ट करू नये असे सांगितले.[3]

***आष्टांग मार्गाची आठ अंगे***

1.सम्यक दृष्टी : चांगली दृष्टी अथवा प्रज्ञाच, अविद्येचा नाश करणारी बुद्धी, ती साधकाला निर्वाणाचे चिंतन करावयास लावते.
2.सम्यक संकल्प : सम्यकदृष्टी असलेल्या साधकाचा निर्वाण प्राप्त करून घेण्याचा दृढ निश्चय म्हणजे सम्यवक संकल्प हा मिथ्यासंकल्प रहित असतो.
3.सम्यक वाचा : सम्यक संकल्प असणाऱ्या माणसाची मिथ्यावाचविरहीत लोकसंग्रहकारक संयमयुक्त वाणी म्हणजे सम्यक वाचा.
4.सम्यक कर्मान्त : वाळीप्रमाणे कृती करणाऱ्या माणसाचे निष्पाप, शुद्ध, असे कार्य.

5.सम्यक जाणीव : सम्यक वाचा कर्मान्तानी युक्त असलेल्या माणसाचे चोरी, लबाडी, इत्यादीपासून अंकीत असणारे निर्वाहाचे साधन म्हणजे सम्यक जाणीव, मृगया, पारध, चौर्यकर्म व्यवसाय यात येत नाही.

6.सम्यक व्यायाम : व्यायाम ऐवजी प्रधान, पराक्रम अशी दुसरी नावेही येतात. आत्तापर्यंत सांगितलेल्या पाच गुणंनी संपन्न असलेल्या माणसाचे शील भूमीवर उभे राहून ध्येयसिद्धीसाठी केलेला अनलस प्रयत्न म्हणजे सम्यक व्यायाम, याची चार उपांगे आहेत. आपल्या अंगात असलेले दुर्गूण घालविणे, आपल्या आंगात नसलेले सद्‌गुण संपादणे, घालविलेले दुर्गंध पुन्हा येवू न देणे, संपादन केलेल्या सद्‌गुणांची जोपासना करणे अशी चार उपांगे होत.

7.सम्यक स्मृती : चित्त स्थिर ठेवून त्याची चलबिचल होवू न देणे म्हणजेच सम्यक स्मृती होय.

8.सम्यक समाधी : चित्ताची एकाग्रता, चित्ताच्या सर्व शक्ती एकवटवून एकाच अवलंबनाकडे लावणे, चित्ताची विक्षेप थांबविणे म्हणजे सम्यक समाधी होय.

सर्व पापांचा त्याग, सर्व पुण्यकर्मांचा संचय व तसेच चित्ते सदैव निर्मळ व पवित्र राखणे हे बुद्धांचे अनुशासन आहे. या धम्मपदातील वचनात बुद्धधर्माचे सार साठवले आहे. गौतमबुद्धाने जीवनाचा नवीन मार्ग दाखवून दिला. हा मार्ग चोखाळल्यास मनुष्याची जन्ममृत्युपासून कायमची सुटका होईल एवढेच सांगितले. जगातील सर्व दुःखापासून मनुष्याची सुटका करावयाची हा हेतू बुद्धाच्या मनात होता. तो साध्य करण्यासाठी त्यांना जो मार्ग सापडला त्याचा त्यांनी लोकांना परिचय करून दिला. धम्मपदात सहनशीलता आणि क्षमाशिलता हे परम तप आहे तर बौद्धांच्या मते निर्वाण हे परम पद आहे.

बाबासाहेब आंबेडकरांचा सारा धर्मविचार लोकशाहीला पोषक अशा जीवन मार्गाच्या शेधाभेवती फिरणारा आहे. त्यामुळे बाबासाहेब बुद्धाने सांगितलेल्या जीवनमार्गाकडे आकर्षित झाले. धम्माला त्यांनी जीवनमार्ग म्हटले आहे. त्यामुळे धम्मातील सामाजिक विचारांना त्यांनी अधिक महत्व दिले. आंबेडकरांनी जो धम्म आपल्याला सांगितला त्याचा सामाजिक आशय तो शासनसंस्थेने साधन म्हणूनच स्पष्ट झालेला आहे. आंबेडकरांच्या मते जर माणूस एकटा असेल तर त्याला धम्माची गरज नाही परंतु ज्या वेळी दोन व्यक्ती कोणत्याही बंधनांनी एकत्र आली की त्यांना आवडो अगर ना आवडो धम्म हा पाहिजेच. त्यापासून त्याची सुटका होत नाही म्हणजे कोणताही समाज धम्माशिवाय असू शकत नाही. समाज कदाचित शासनसंस्थेने साधन म्हणून धम्माची निवड करणार नाही. कारण धम्म हा जर शासनसंस्थेने साधन नसेल तर तो निरर्थक आहे. समाज हा धम्माच्या निवडीसह न्यायाधिशाची निवड करतो म्हणजे जेथे लोक धम्माचे उल्लंघन करतील तेथे न्यायाधिशाची गरज पडते. मा जेथे धम्मावर आधरलेल्या लोकशाही मार्गाने शासन चालते तेथे धम्माचा उपयोग होतो. मात्र धम्माचे उल्लंघन होईल तेथे अराजक निर्माण होते. हुकूमशाहीत स्वातंत्र्य नष्ट होते. म्हणून शांततेत अहिंसेतच स्वातंत्र्य सुरक्षित राहते.

प्रज्ञा म्हणजे निर्मळ बुद्धी प्रज्ञेत्न आपल्या धम्माच्या दोन आधरस्तंभापैकी एक मानले आहे. कारण त्यांना अंधश्रद्धा मान्य नव्हती करूणा म्हणजे प्रेम, या प्रेमाशिवाय समाज जगू शकत नाही व विकसित होत नाही. म्हणून बुद्धाने करूणेला आपल्या धम्माचा दुसरा आधारस्तंभ मानले आहे. बाबासाहेबांनी हीच बुद्धाच्या धम्माची व्याख्या सांगितली आहे. ती धर्मापेक्ष भिन्न आहे. प्रज्ञा आणि करूणेचा अलौकिक संगम म्हणजेच बुद्धांचा धम्म होय.

आंबेडकरांनी धम्म आणि धर्म यात भेद करून जे विचार व्यक्त केलेले आहेत ते समजून घेवून धर्मान्तराच्या संकल्पनेचा विचार करता येतो. धम्माची आंबेडकरांनी दिलेली व्याख्या दुर्लक्षित केली तर धम्माचा धर्म करायला फार वेळ लागणार नाही आणि धर्मामुळे जे अनर्थ होतात त्याचे परिणाम संपूर्ण समाजाला भोगावे लागतील. बाबासाहेबांनी धम्म हा धर्मापेक्षा तात्वीकदृष्ट्या आणि मुळातच वेगळा आहे हे सांगितले त्यांच्या मते, धर्माचा उद्देश हा जग बदलण्याचा आहे. जगाला अधिक चांगले करण्याचा आहे. म्हणजे समाजवादी समाज रचनेच्या निर्मितीसाठी या जगाची पुर्नरचना करावी लागेल. धम्माच्या साहाय्याने स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय यावर उभ्या असणाऱ्या लोकशहीची निर्मिती करण्याची प्रेरणा देणारे समाजाचे विज्ञान आहे असे म्हटले आहे. बाबासाहेब आंबेडकरांची धर्मसंकल्पना म्हणजे नीतीची संकल्पना आहे. आंबेडकरांनी धर्म आणि धम्म या संकल्पनात फरक केला आहे. नीती म्हणजे नीती आणि नीती म्हणजे धम्म होय. धम्मात देवाला स्थन नाही तर नीतीला महत्व आहे. धमत प्रार्थना, तीर्थयात्रा, कर्मकांड विधी अथवा यज्ञ यांना स्थन नाही. नीतीला महत्व आहे. धम्मात प्रार्थना, तीर्थयात्रा, कर्मकांड विधी अथवा यज्ञ यांना स्थन नाही. नीती हे धम्माचे सार आहे. त्याशिवाय धम्म नाही धम्मात माणसाने माणसावर प्रेम केले पाहिजे यातून नीतीचा उगम होतो. त्यासाठी परमेश्वराला संतुष्ट करण्यासाठी नाही तर स्वहितासाठी नीतीवान व्हायचे.

नीतीला पवित्र्य देण्यात तीन घटक कारणीभूत आहेत. पहिला घटक म्हणजे श्रेष्ठांचे संरक्षण करण्याची सामाजिक हिताच्या दृष्टीने आवश्यकता सांगितली. दुसरा घटक मानवी समाजाचा विकास व तिसरा घटक जो सर्व शक्तीमान त्याच्यावर निर्बंध पाहिजे तरच दुर्बलांचे संरक्षण होईल म्हणजे नीती ही सर्वव्यापक व पवित्र असायला हवी त्यामुळे व्यक्तिविकासाला संरक्षण मिळते. म्हणून आंबेडकरांच्या धर्मसंकल्पनेत व्यक्तिविचारापेक्षा समाजविचार अधिक केलेला आहे. त्यासाठी जातीसंस्थेचा उच्छेद या नावाने 1936 साली प्रसिद्ध झालेले जे भाषण आहे त्यात हिंदूधर्माची विस्तृत समीक्षा केली आहे. भारतात राजकीय क्रांती करावयाची असेल तर सामाजिक आणि धार्मिक क्रांती अगोदर होणे आवश्यक आहे. म्हणजे आंबेडकरांचा धम्म मानवतावादी विचारांचा आहेत त्यासाठी त्यांना माणसाने माणसावर प्रेम केले पाहिजे असा संदेश दिला.

धर्माचा विचार करतांना आंबेडकर तत्व आणि नियम यात फरक करतात. धर्म हा प्रामुख्याने केवळ तत्वांचा विषय असला पाहिजे तो नियमाचा विजय असता कामा नये. ज्या क्षणी नियमांचे अधःपतन होणे त्या क्षणी धर्म हा धर्म राहत नाही. त्यांच्या मते ज्याला हिंदुधर्म म्हणतात. तो कायदा आहे किंवा वर्गीय नीतीने उत्तम कायदेशीर रूप आहे, त्यासाठी हिंदूधर्मात सुधारणा होण्याची गरज सांगितली आहे.

### *संदर्भसूची*

1.कसबेकर विजय, सिद्धांत आणि व्यवहार, श्रीरामपूर 1989, प्रथमावृत्ती, पृ. 95, 112.

2.डहाके वसंत आबाजी, मराठी साहित्य आणि संस्कृती, मुंबई, 2005, पृ. 247.

3.खैरमोडे चां. भ., डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोड बील, सुगावा प्रकाशन, पुणे, चतुर्थ आवृत्ती, 2002.

4.गायकवाड प्रदीप (संपा.), कामगार चळवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, नागपूर, 2001.

5.मुनवसंत मिनाक्षी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक, मुंबई, 1990.

6.आंबेडकर डॉ. बाबासाहेब, जातीसंस्थेचे उच्चाटन (अनु–वसंत मून), नागपूर, 1974.

7.आंबेडकर डॉ. बाबासाहेब, हिंदुत्वातील कूट प्रश्न, पुणे प्रकाशन, वर्ष अनुपलब्ध.

8.काणे पा.वा., धर्मशास्त्राचा अभ्यास, पूर्वार्ध महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 1980.

9.आंबेडकर बी. आर., बुद्ध ॲण्ड हिज धम्म, दुसरी आवृत्ती, बाम्बे, पृ.

78.
10.गॉजरे (संपा), बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, खंड 1, पृ. 28.
11.Buddha & His Dhamma (page No.226) & (Page No. 23 to 234).



*अनिल माणिकराव बैसाणे*
माजी इतिहास विभाग प्रमुख, झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे .

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.net